नियमित दिवाणी दावा क्र.८८/२०१५

## तुर्तातुर्त मनाई ताकीद अर्जावरील (नि.५) वरील आदेश.

बाळाप्पा सुतार मयत वारस विरुध्द बंडू सुतार व इतर

वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द कायमस्वरुपी मनाई हुकूम होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेचे क्रम ३९ नियम १ व २ आणि कलम १५१ अन्वये, वादपत्रातील नमुद व वर्णन केलेल्या मिळकतीतील व मिळकतीत पूर्व बाजूस असलेला दक्षिणोत्तर चालीचा वादींच्या खाजगी मालकीहक्काचा बोळरस्ता यामधील (यापुढे सदर मिळकतीस सोयीकरीता 'वादग्रस्त मिळकत' असे संबोधिण्यात येते.) वादींच्या शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादी यांनी स्वतः अगर इतरांमार्फत हरकत अगर अडथळा करु नये, मिळकतीत येवू नये, मिळकतीत पूर्व बाजूस असलेल्या वादींच्या भिंतीस कोणत्याही प्रकारची इजा पोहचवू नये व भिंत पाडू नये असा तात्पुरता मनाई हुकूम दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय होईपावेतो त्यांचेविरुध्द मिळणेसाठी सादर केलेला आहे.

३. वादपत्रातील व प्रस्तुत अर्जातील वादींचे थोडक्यात कथन असे आहे की, वादग्रस्त मिळकत ही वादी आणि प्रतिवादी क्र.६ व ७ यांच्या वडीलार्जित मालकीवहिवाटीची मिळकत असून, त्याचेशी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचा कोणत्याही हक्काने काहीएक संबंध नाही. सि. स. क्र.८१३ यामध्ये वादी व प्रतिवादी क्र.६ आणि ७ यांनी त्यांची राहती घरे पूर्व बाजूस बांधलेली असून, राहत्या घरांच्या समोर पूर्व बाजूस सि. स. क्र.८१३ मध्येच दक्षिणोत्तर चालीचा वर नमूद बोळरस्ता ठेवला आहे. सदर बोळरस्ता सि. स. क्र.८१३ च्या सिटी सर्व्हेकडील नकाशामध्ये सि. स. क्र.८१३ ची खुली जागा असा दर्शविण्यात आला आहे. प्रतिवादी क्र.१ ते ५ हे सि. स. क्र.८१३ च्या पूर्वेस असलेली मिळकत सि. स. क्र. ८१० या मिळकतीचे धारक आहेत. अलिकडे सदर प्रतिवादी हे वादग्रस्त मिळकतीत त्यांचे नसलेले हक्क सांगून वादग्रस्त मिळकतीतील वादींच्या मालकीवहिवाटीस हरकत अडथळा करु लागले आहेत. सदर प्रतिवादी हे सि. स. क्र.८१३ पैकी वादींची असलेली खाजगी बोळरस्त्याची मिळकत ही सि. स. क्र.८१० या मिळकतीचा भाग आहे असे म्हणू लागले असून, वादींना त्यातील वहिवाटीस हरकत करु लागले आहेत. तंटामुक्त समिती ग्रामपंचायत हेरवाड मार्फत वादी व प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचेसमक्ष मिळकतीची खाजगी मोजणी करण्यात आली असता; मोजणीअंती वादग्रस्त

मिळकतीत असलेला बोळरस्ता हा पूर्णतः वादींच्या सि.स.क्र.८१३ मध्ये असल्याचे निदर्शनास आले. तथापि; प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचेकडून वादींना होणारा नाहक त्रास वाढतच गेला. त्यामुळे वादींनी सि. स. क्र.८१३ मध्ये पूर्व बाजूस सि. स. क्र.८१० या मिळकतीस लागून दक्षिणोत्तर चालीची भिंत ग्रामपंचायत हेरवाड यांचेकडून रितसर परवानगी घेवून बांधली आहे.

४. वादपत्रातील व अर्जातील वादींचे थोडक्यात पुढील वादकथन असे आहे की, दिनांक १७.१०.२०१४ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी सि. स. क्र.८१० ची मोजणी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, शिरोळ यांचेकडून करुन घेवून त्याप्रमाणे हद्दी दर्शविण्यात आल्या. सदर मोजणीमध्येसुध्दा प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्या सि. स. क्र.८१० या मिळकतीचा वादग्रस्त मिळकतीत पूर्व बाजूस असलेल्या बोळरस्त्याशी काहीसंबंध नसल्याचे निदर्शनास आले आहे. अशाप्रकारे वादग्रस्त मिळकतीतील वादींच्या मालकीवहिवाटीशी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचा काहीएक संबंध नव्हता व नाही. अशी वस्तुस्थिती असताना; सदर प्रतिवादी हे वादग्रस्त मिळकतीतील वादींच्या कायदेशीर मालकीवहिवाटीस हरकत व अडथळा करीत आहेत. वादग्रस्त मिळकतीमधील पूर्व बाजूस असलेली भिंत काढून त्या ठिकाणी सि.स.क्र.८१० ची चौकट बसवून रस्ता करणार अशी धमकीची भाषा सदर प्रतिवादींनी वादींना वापरली आहे. समजावून सांगूनदेखील सदर प्रतिवादी हे ऐकण्याच्या मनस्थितीत नाहीत. वादींना सकृतदर्शनी केस असून, न्यायाचा समतोल त्यांचेच वतीने आहे. अर्ज मंजूर करण्याने सदर प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. तथापि; अर्ज नामंजूर करण्याने वादींचेच अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी स्वतः अगर इतरांमार्फत वादग्रस्त मिळकतीतील वादींच्या शांततामय मालकीकब्जेवहिवाटीस हरकत अगर अडथळा करु नये, मिळकतीत येवू नये, मिळकतीत पूर्व बाजूस असलेल्या वादींच्या भिंतीस कोणत्याही प्रकारची इजा पोहोचवू नये व भिंत पाडू नये असा तात्पुरता मनाई हुकूम दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय होईपावेतो त्यांचेविरुध्द मिळणेची त्यांनी मागणी केली आहे.

५. प्रतिवादी क्र.१ ते ७ यांना प्रस्तुत दाव्याच्या व अर्जाच्या समन्स/ नोटीसांची बजावणी झाल्यानंतर प्रतिवादी क्र.१ व ५ यांनी त्यांची कैफियत व म्हणणे प्रकरणात हजर होवूनही सादर केले नाही. त्यामुळे दावा व अर्ज प्रतिवादी क्र.१ व ५ यांच्या कैफियत व म्हणण्याशिवाय चालविण्यात यावा असा आदेश नि.१ वर निर्गमित करण्यात आला. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी दाव्यास कैफियत व नि.५ वरील अर्जास म्हणणे आणि प्रतिदावा नि.२५ वर सादर केला आहे. प्रतिवादी क्र.६ व ७ यांनी नि.३५ वर दाव्यास कैफियत दाखल केली आहे. वादींनी नि.२५ वरील प्रतिदाव्यास आपली कैफियत दाखल

करुन प्रतिदाव्यातील कथने साफ फेटाळून लावली आहेत.

६. प्रतिवादी क्र.६ व ७ यांनी नि.३५ वर त्यांच्या कैफियतीत दाव्यातील संपूर्ण मजकूर त्यांना मान्य व कबूल असल्याचे प्रतिवादकथन सादर केले आहे. दावा व अर्ज खर्चासह मंजूर करण्याची विनंती सदर प्रतिवादींनी केली असून, नि.२८ वरील प्रतिदावा फेटाळण्याची मागणी पुढे त्यांनी केली आहे.

७. नि.२५ वरील प्रतिवादी क्र.२ ते ४ यांची थोडक्यात प्रतिवादकथने अशी आहेत की, वादग्रस्त मिळकतीचे वर्णन पूर्णतः खोटे व चुकीचे आहे. दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही. वादींनी मुळ वस्तुस्थिती लपवून ठेवून दाव्याचा व तुर्तातूर्त मनाई अर्जाचा बनाव केला आहे. सि. स. क्र.८१० च्या पश्चिमेला व सि. स. क्र.८१३ च्या पूर्वेस सर्वसाधारण पूर्व–पश्चिम ७ फुट रुंदीचा व दक्षिणोत्तर सर्वसाधारण १०० फुट लांबीचा बोळरस्ता हा कधीही वादग्रस्त मिळकत सि. स. क्र.८१३ या मिळकतीचा भाग नव्हता व नाही. वादींनी खोटा व चुकीचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादींनी सि. स. क्र.८१० च्या पश्चिमेस असलेल्या बोळरस्त्यालगत सन १९८४ मध्ये पश्चिमाभिमुखी घर बांधले आहे. सदर बोळरस्त्याच्या पूर्वेला सि. स. क्र.८१० च्या असलेल्या दक्षिणेकडील भिंतीपासून ३–५ फुटावर २ फुटांची खिडकी सोडली आहे. त्या खिडकीपासून उत्तरेला १०.६ फुटावर ३.१ फुटाचा दरवाजा आहे. सदरचा दरवाजा हा सदर बोळरस्त्यापुढे उघडतो. या दरवाजापासून उत्तरेला २ फुट अंतरावर सर्वसाधारणपणे ३.५ फुटाचा आणखी एक दरवाजा असून, सदरचा दरवाजा बोळरस्त्याच्या पुढे उघडतो. सदर बोळरस्त्याच्या पुर्वेस सि. स. क्र.८१० मध्ये ये जा करण्याकरीता सन १९८४ पासून बोळरस्त्यावर उघडणारे दरवाजे बसविलेले आहेत. सदरचा बोळरस्ता हा उत्तरेला ग्रामपंचायतीच्या रस्त्याला जावून मिळतो. सदर बोळरस्त्याचा वापर हा प्रस्तुत प्रतिवादी हे त्यांच्या सि. स. क्र.८१० मधील घरात ये जा करण्याकरीता मालक या नात्याने वादी यांच्याबरोबर सामाईकात करीत होते. तसेच; याच बोळरस्त्याचा वापर वादी हे त्यांच्या सि. स. क्र.८१० मधील घरात ये जा करण्याकरीता करीत होते. तथापि; बोळरस्ता हडप करण्याकरीता सि. स. क्र.८१३ या मिळकतीचा तो भाग आहे असे दर्शवून दाव्याचा बनाव करण्यात आला आहे. दिनांक २१.८.२०१४ रोजी प्रतिवादी हे पंढरपूर येथे देवदर्शनासाठी गेल्याचा गैरफायदा घेवून वादींनी दांडगाव्याने सि. स. क्र.८१० मध्ये प्रतिवादींच्या असलेल्या घरमिळकतीच्या पश्चिम भिंतीलगत ४ इंच रुंदीचे व सर्वसाधारणपणे ६ फुट उंचीचे विटांच्या भिंतीचे दांडगाव्याने बांधकाम केलेले आहे. सदरील बांधकामामुळे प्रतिवादींच्या घराच्या पश्चिम बाजूकडील २ दरवाजे व ३ खिडक्या हया पूर्णपणे बंद झाल्या आहेत. प्रतिवादींना सि. स. क्र.८१० मधून पश्चिमेकडे असलेल्या बोळरस्त्यावर वादींनी येणेजाणे बंद करुन टाकले

आहे. बेकायदेशीर बांधकामास वादी हे न्यायालयामार्फत मनाई हुकूम मिळवू पहात आहेत.

८. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांची पुढील प्रतिवादकथने अशी आहेत की, वादग्रस्त बोळरस्ता हा फक्त सि. स. क्र.८१३ या मिळकतीचा भाग नसून, त्या रस्त्यामध्ये सि. स. क्र.८१० चा भागही समाविष्ट आहे. सदरचा बोळरस्ता हा सि. स. क्र.८१० व ८१३ यांच्या धारकाकरीता समाईकातील बोळरस्ता आहे. वादींनी दांडगाव्याने बोळरस्त्याच्या पूर्वेस बांधलेल्या भिंतीबाबत प्रतिवादींनी त्यांना विचारणा केली असता; वादींनी वेगवेगळी उत्तरे देवून चालढकल केली आहे. वादी हे स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आलेले नाहीत. सि. स. क्र.८१० व ८१३ या मिळकतींच्या सर्व धारकांना पक्षकार म्हणून सामील केल्याखेरीज प्रस्तुतचा दावा टिकण्यास पात्र नाही. वादींना वर नमूद भिंतीचे बांधकाम करण्याची अधिकारिता नसल्यामुळे भिंत तात्काळ काढून घेवून सदरचा बोळरस्ता खुला करावा असा आज्ञार्थक आदेश त्यांचेविरुध्द होणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रतिवादींना सकृतदर्शनी केस असून, न्यायाचा समतोल त्यांच्यावतीने आहे. खोटा व खोडसाळ दावा दाखल करुन प्रतिवादींना आर्थिक व मानसिक त्रास दिल्याप्रकरणी ते वादींकडून २५,०००/–रुपये नुकसानभरपाई खर्च मिळणेस पात्र होतात. अर्ज नामंजूर झाल्यास वादींचे कसलेही नुकसान होणार नाही. तथापि; अर्ज मंजूर झाल्यास वादींच्या बेकायदेशीर कृत्यास पाठींबा दिल्यासारखे होणार असून, त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादींचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. दावा व अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा. प्रतिदावा खर्चासह मंजूर करण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज फेटाळण्याची विनंती प्रस्तुत प्रतिवादींनी केली आहे.

९. अभिलेख पहाता; प्रस्तुत अर्जावर दिनांक १६.४.२०१५ रोजी माझ्या पुर्वाधिका–यांनी प्रतिवादींविरुध्द अंतरिम एकतर्फा मनाई हुकूम निर्गमित केलेला आहे. सदर आदेशापासून ३० दिवसांच्या कालावधीत प्रस्तुतचा अर्ज अंतिमतः निकाली निघालेला नाही. **व्ही. नायडू विरुध्द चेलाप्पन्न एआयआर २००० सर्वोच्च न्यायालय ३०३२** या न्यायनिवाडयातील मार्गदर्शक तत्वाप्रमाणे त्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत. अभिलेख व रोजनामा पहाता; दि.२०.४.१५ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ४ हे त्यांच्या विधीज्ञांमार्फत व प्रतिवादी क्र.५ हा दिनांक २८.४.२०१५ रोजी त्याच्या विधीज्ञांमार्फत हजर झाले. त्यानंतर उन्हाळी सुट्टयांमुळे दिवाणी कामकाज बंद राहिल्यामुळे दिनांक १५.६.२०१५ अशी तारीख निश्चित करण्यात आली. दिनांक १५.६.२०१५, ३०.६.२०१५, १३.७.२०१५ या तारखांना प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी त्यांची कैफीयत सादर केली नाही. दिनांक २८.७.२०१५ रोजी प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी कैफीयत व प्रतिदावा सादर केला. तद्नंतर दिनांक १०.८.२०१५ रोजी प्रकरण या न्यायालयात वर्ग

झाले. दरम्यानच्या कालावधीत वादी क्र.१ मयत होवून त्याचे वारस इतर वादींना अभिलेखावर आणण्यास कालावधी लागला. तद्नंतर प्रतिदाव्यास वादींनी आपली कैफीयत सादर केली. दिनांक २८.०९.२०१५ रोजी उभय पक्षकारांतर्फे प्रस्तुत अर्जावर संपुर्ण युक्तीवाद होवून आजरोजी प्रस्तुतचा अर्ज अंतिम निर्गतीसाठी विचारात घेण्यात आला आहे.

१०. वाद आणि प्रतिवाद कथनावरुन खालील मुद्दे माझ्या विचाराधीन उपस्थित झाले. ते मुद्दे आणि त्यावरील माझे निष्कर्ष सबळ कारणमीमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | वादींना सकृतदर्शनी केस आहे काय ? | ... | नाही. |
| २. | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय ? | ... | नाही. |
| ३. | तात्पुरता मनाई आदेश न दिल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | ... | नाही. |
| ४. | अंतिम आदेश कोणता ? | ... | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## :: कारणमीमांसा ::

११. वादींनी वादपत्रातील व अर्जातील कथनांच्या पुष्ठयर्थ सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यादाखल; मौजे हेरवाड येथील सि.स.क्र.८१३ या मिळकतीची आखीव पत्रिका, वादग्रस्त मिळकतीच्या उपअधिक्षक भूमि अभिलेख, शिरोळ यांचेकडील नकाशाची प्रमाणित प्रत, मौजे हेरवाड येथील सि. स. क्र.८१३ या मिळकतीची सनद, सि. स. क्र.८१३, ८१० व ८१४ या मिळकतींच्या एकत्रित नकाशांची प्रमाणित प्रत, मौजे हेरवाड येथील सि. स. क्र.८१३ या मिळकतीचा चौकशी रजिस्टरातील नोंदीच्या उता–याची प्रमाणित प्रत, सि. स. क्र.८१० या मिळकतीच्या आखिव पत्रिकेची छायांकित प्रत, सि. स. क्र.८१० या मिळकतीच्या उप अधीक्षक भूमि अभिलेख, शिरोळ यांचेकडील नकाशाची प्रमाणित प्रत, मौजे हेरवाड येथील सि. स. क्र.८१० या मिळकतीचा चौकशी रजिस्टरातील

नोंदीच्या उता–याची प्रमाणित प्रत, वादींनी तंटामुक्त अध्यक्ष, हेरवाड यांच्याकडे दाखल केलेल्या तक्रार अर्जाची प्रत, तंटामुक्त समिती यांचेकडील दिनांक ३१.७.२०१४ रोजीच्या तडजोडनाम्याची छायांकित प्रत, वादग्रस्त मिळकतींची छायाचित्रे, सि. स. क्र.८१० या मिळकतीच्या तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांचेकडील मोजणी नकाशाची प्रमाणित प्रत, वादींनी दाखल केलेला कॅव्हेट अर्ज, वादी क्र.८ मधुकर शंकर सुतार याने ग्रामपंचायत हेरवाड यांच्याकडे बांधकाम करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केलेल्या अर्जाची प्रमाणित प्रत, ग्रामपंचायत हेरवाड यांचेकडील ठराव क्र.५८/१ याची मुळप्रत, बांधकाम परवान्याची मुळप्रत, वादी क्र.८ यास प्राप्त झालेले ग्रामपंचायतीकडील सामान्य पावती, सि. स. क्र.८१३ मधील गोषवारा, सि. स. क्र.८१३ मधील नकाशाची प्रत, वादी क्र.१ याच्या मृत्यूचे प्रमाणपत्र, उपअधिक्षक भूमि अभिलेख शिरोळ यांनी वादींना दिलेले पत्र व तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, शिरोळ यांचेकडील मोजणी नकाशा इत्यादी कागदपत्रे सादर केली आहेत. मौखिक सकृतदर्शनी पुराव्याकामी साक्षीदारांची शपथपत्रे वादींनी सादर केली आहेत.

१२. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यादाखल; वादग्रस्त बोळरस्ता व त्याच्या पश्चिमेला असलेल्या प्रतिवादींच्या घराची छायाचित्रे, छायाचित्रांच्या बिलाची पावती, वादींनी वादग्रस्त बोळरस्त्यात भिंत बांधून प्रतिवादींच्या खिडकी व दरवाजा बंद केल्याची छायाचित्रे, नेर्ले फोटो स्टुडियो यांचेकडून मिळालेली सीडी व प्रतिवादी क्र. २ व गोविंद बाळकृष्ण सुतार यांचेदरम्यान दिनांक ९.६.१९९८ रोजी झालेले करारपत्र इत्यादी कागदपत्रे सादर केली आहेत. मौखिक सकृतदर्शनी पुराव्याकामी साक्षीदाराचे शपथपत्र सदर प्रतिवादींनी सादर केले आहे.

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ३ करीता</u> :–**

१३. मुद्दा क्र. १ ते ३ हे परस्परांशी निगडीत असल्याने; त्यांचे विवेचन न्यायाच्या दृष्टीकोनातून एकत्रीतपणे करण्यात येत आहे. वादींतर्फे सुविद्य विधीज्ञ श्री. डी.डी. मगदूम यांचा, प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचेतर्फे सुविद्य विधीज्ञ श्री.पी.आर.भेंडवडे आणि प्रतिवादी क्र.६ व ७ यांचेतर्फे सुविद्य विधीज्ञ श्री.एस. डी. पाटील यांनी केलेला संपूर्ण युक्तीवाद ऐकला. वादींतर्फे खालील न्यायनिवाडे सकृतदर्शनी बाजू शाबीत करणेकामी सादर करण्यात आले आहेत.

१. **करेव्वा विरुध्द हुसेनसाब एआयआर २००२ सर्वोच्च न्यायालय ५०४.**
२. **जे.राय विरुध्द मनदेव राय एआयआर १९९७ पटना १२४.**
३. **तारकदास विरुध्द सरकार एआयआर १९३५ प्रिव्ही कौन्सील १२५.**

४. **सतिश विरुध्द यु.पी. सरकार एआयआर १९८६ अलाहाबाद १२६.**

१४. वर नमूद न्यायनिवाडयातील वाद तथ्यांचे व मार्गदर्शक तत्वांचे प्रस्तुत अर्जाच्या अंतिम न्यायनिर्णयाच्या कामी अवलोकन केले. **करेव्वा विरुध्द हुसेनसाब** यामधील मार्गदर्शक तत्वे ही महसूल दप्तरी नोंदीच्या अनुषंगाने गृहितकाविषयी आहेत. **जे.राय विरुध्द मनदेव राय** यामधील मार्गदर्शक तत्वे ही अधिकार अभिलेखातील एखादी नोंद ही चुकीची आहे अशी केस पक्षकार घेवून आला असेल तर त्याच्या शाबीतीची जबाबदारी त्या पक्षकारावर आहे याचेशी संदर्भात आहेत. **तारकदास विरुध्द सरकार** यामधील मार्गदर्शक तत्वे ही महसूल अधिका-याने उचित चौकशी करुन नकाशे तयार केले असतील तर असे नकाशे हे बरोबर असल्याचे गृहित धरण्यात यावे या अनुषंगाने आहेत. **सतिश विरुध्द यु.पी. सरकार** यामधील मार्गदर्शक तत्वे ही अभिकथनामधील कबूली तथ्ये ही पक्षकारांच्या अधिकारांचा पाया दर्शवितात या अनुषंगाने आहेत.

१५. वाद-प्रतिवाद कथनांच्या अवलोकनावरुन व उभय पक्षकारांतर्फे सादर झालेल्या युक्तीवादावरुन; उभय पक्षकारांना सकृतदर्शनी मान्य व कबूल असणारी बाब म्हणजे मौजे हेरवाड येथील सि. स. क्र. ८१३ ही मिळकत वादी आणि प्रतिवादी क्र.६ व ७ यांच्या वडीलार्जित मालकीवहिवाटीची मिळकत आहे आणि सि. स. क्र. ८१० ही मिळकत प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्या मालकीवहिवाटीची मिळकत आहे. वादकथनानुसार, सि. स. क्र.८१३ ही मिळकत व त्या मिळकतीतील पूर्व बाजूस असलेला दक्षिणोत्तर चालीचा वादींच्या खाजगी मालकीहक्काचा बोळरस्ता ही देखील सि. स. क्र.८१३ या मिळकतीचाच भाग असून, ती संपूर्ण वादग्रस्त मिळकत आहे. एकूणच बोळरस्त्याच्या अनुषंगाने वादींनी आपली मालकीवहिवाट सांगितली आहे. वादकथनानुसार, सि. स. क्र.८१३ च्या सिटी सर्व्हेकडील नकाशामध्ये बोळरस्ता हा सि. स. क्र.८१३ ची खुली जागा अशी दर्शविण्यात आली आहे. सदरील मिळकतीच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी वादींच्या तथाकथित कब्जेवहिवाटीस हरकत केली असल्याचे वादकथन सादर करण्यात आले आहे. या संपुर्ण बाबी प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी नि.२५ वरील त्यांच्या कैफियतीत साफ नाकारलेल्या आहेत. वादग्रस्त मिळकतीचे वर्णन पूर्णतः खोटे व चुकीचे असल्याचे प्रतिवादकथन सादर झालेले आहे.

१६. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांच्या प्रतिवादकथनानुसार, सि. स. क्र.८१० व ८१३ या मिळकतीतील सर्व धारकांना पक्षकार म्हणून सामील केले नसल्याने, प्रस्तुतच्या दाव्यास आवश्यक पक्षकार सामील न केल्याच्या तत्वाची बाधा येते. तथापि; सि. स. क्र.८१० व ८१३ यामधील इतर धारक हे आवश्यक पक्षकार प्रस्तुतकामी होतात किंवा

कसे आणि त्यांच्या अनुपस्थितीत प्रस्तुतचा दावा चालण्यास पात्र नाही किंवा कसे इत्यादी बाबी हया दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयाच्या वेळी गुणवत्तेवर तपासून पहाणे इष्ट होणार आहे. त्या मुद्दयाचा निष्कर्ष प्रकरणाची आजची स्थिती पहाता देता येणार नाही. तसेच खोटा व खोडसाळ दावा दाखल करुन प्रस्तुत प्रतिवादींना आर्थिक व मानसिक त्रास झालेला आहे किंवा कसे आणि ते वादींकडून नुकसानभरपाईपोटी रक्कम खर्च म्हणून मिळणेस पात्र होतात किंवा कसे या मुद्दयाचा निष्कर्ष दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयाच्या वेळी गुणवत्तेवर देणे योग्य होणार आहे.

१७. वादींच्या हक्कात त्यांनी मागितलेली तुर्तातूर्त मनाई हुकूमाची मागणी मंजूर करण्याकरीता त्यांनी सर्वप्रथम त्यांचे प्रकरण सकृतदर्शनी आहे, न्यायाचा तराजू त्यांचे बाजूने झुकणारा आहे आणि तुर्तातूर्त मनाई हुकूम वादींच्या हक्कात न दिल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे हे मुद्दे शाबीत करणे जरुरीचे आहे. वादींनी सि. स. क्र.८१३ सह पूर्व बाजूस असलेल्या दक्षिणोत्तर चालीच्या बोळरस्त्यावर ' खाजगी मालकीहक्काने ' आपली वहिवाट सांगितलेली असल्याने तसे त्यांनी प्रथमदर्शनी शाबीत करणे जरुरीचे आहे. वादींतर्फे साक्षीदार सुनील सुतार व साक्षीदार बाबासाहेब शिंदे यांनी अनुक्रमे नि.३६ व ३७ वरील शपथपत्रामध्ये वादपत्रातील मजकुर सकृतदर्शनी कथन केला आहे. तर प्रतिवादी क्र.२ ते ४ यांच्यातर्फे साक्षीदार कल्लाप्पा बेडक्याळे याने नि. ५० वरील त्याच्या शपथपत्रात नि.२५ वरील कैफियतीतील मजकुर सकृतदर्शनी कथन केला आहे. वाद-प्रतिवाद कथन पहाता; प्राप्त झालेला सकृतदर्शनी कागदोपत्री पुरावा प्रथमदर्शनी प्रकरण पहाण्याकरीता जरुरीचा असून, नि.३६,३७ अथवा ५० यावरील शपथपत्रांवर विसंबून राहून वादी अथवा प्रतिवादी यांचे हक्कात सकृतदर्शनी दाद देता येणार नाही. शिवाय साक्षीदार सुनील, बाबासाहेब अथवा कल्लाप्पा यांच्यापैकी कोणीही सि.स. क्र.८१३ व ८१० या मिळकतींच्या लगतचा हिस्सेदार असल्याचे सकृतदर्शनी दिसून आलेले नाही. त्यामुळे नि.३६,३७ व ५० वरील मौखिक सकृतदर्शनी पुराव्यास काहीही अर्थ उरत नाही.

१८. उभय पक्षकारांनी वादींच्या सि. स. क्र.८१३ या मिळकतीच्या पूर्व दिशेस प्रतिवादी क्र. १ ते ५ यांची सि. स. क्र.८१० ही मिळकत असल्याचे सकृतदर्शनी नाकारलेले नाही. उप अधीक्षक भूमि अभिलेख, शिरोळ यांचेकडील सि. स. क्र.८१३ , ८१०,८१४ व अन्य मिळकतीसंदर्भातील नकाशाच्या प्रमाणित प्रतीचे अवलोकन केले असता; सि. स. क्र.८१३ व सि. स. क्र.८१० या दोन्ही मिळकतींच्या मध्ये मोकळी जागा असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. याच मोकळया जागेच्या अनुषंगाने वादी व प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी आपआपली वहिवाट सांगितली असल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र.२ ते

४ यांनी कैफियत परिच्छेद क्र.१३ मध्ये सदर जागेचा बोळरस्ता म्हणून वापर प्रतिवादी हे त्यांच्या सि. स. क्र.८१० मधील घरात ये जा करण्याकरीता मालक या नात्याने वादींच्या बरोबर सामाईकात करीत होते असे सकृतदर्शनी कथन केले आहे. एकूणच काहीअंशी वादींची सदर जागेवरील सामाईकातील वहिवाट प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी सकृतदर्शनी मान्य केली आहे. तथापि; वादी हे सदर जागेच्या अनुषंगाने त्यांची खाजगी मालकीहक्काची वहिवाट असल्याची विशिष्ट केस घेवून आले असल्याने; तसे त्यांनी सकृतदर्शनी शाबीत करणे जरुरीचे आहे.

१९. मौजे हेरवाड येथील सिटी सर्व्हे चौकशी रजिस्टरातील नोंदीच्या सि. स. क्र.८१३ या मिळकतीच्या उता-याचे अवलोकन केले असता; आत्माराम बाळा सुतार व शंकर बाळा सुतार यांची धारक म्हणून नोंद सिटी सर्व्हे चौकशीच्या वेळी ९९२.६ चौरस मीटर या क्षेत्राकरीता करण्यात आली होती असे सकृतदर्शनी दिसून येते. दिनांक २७.६.२०१४ रोजी तंटामुक्ती अध्यक्ष, ग्रामपंचायत हेरवाड यांच्याकडे वादींसह अन्य लोकांनी सि. स. क्र.८१३ मध्ये बांधकाम संदर्भात व प्रतिवादी क्र.२ यांचेविरुध्द तथाकथित त्रासाबाबत तक्रार अर्ज दिला असल्याचे त्यावरील मजकुरावरुन दिसून येते. दिनांक ३१.७.२०१४ रोजीच्या तंटामुक्त समिती यांचेकडील तडजोडनाम्याच्या छायांकित प्रतीचे अवलोकन केले असता; सि. स. क्र.८१० व ८१३ यांचेमधील साधारणपणे ६ फुट रुंदी व १०० फुट लांबीच्या रस्त्यासंदर्भात समितीसमोर बैठक घेण्यात आलेली होती व तो रस्ता सि. स. क्र.८१३ मध्ये असल्याचे दिसते व प्रतिवादी क्र.२ यास ते मान्य नाही अशा आशयाचा मजकुर परिच्छेद क्र.४ मध्ये नमूद असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. तथापि; वर नमुद वादग्रस्त बोळरस्ता हा सि. स. क्र.८१३ यामध्येच असल्याचे दिसते असा तंटामुक्त गांव समिती हेरवाड यांनी दिलेल्या निर्वाळयावरुन वादींच्या हक्कात सकृतदर्शनी अनुकूल असे अनुमान मुळीच काढता येणार नाही. प्रकरणात जी छायाचित्रे सादर करण्यात आली आहेत; त्या छायाचित्रांवरुन सि. स. क्र.८१३ व सि. स. क्र.८१० या दोन्ही मिळकतींच्यामध्ये असलेल्या मोकळया जागेवर कोणत्या पक्षकाराचा ताबा आहे हे कदापीही ठरविता येणार नाही.

२०. सकृतदर्शनी कागदोपत्री पुरावा पहाता; वादींनी मौजे हेरवाड येथील ग्रामपंचायतकडे सि. स. क्र.८१३ मध्ये पूर्व बाजूस कंपाउंडचे बांधकाम करण्याची परवानगी मागीतली होती व तसा बांधकाम परवाना वादींना जावक क्र.९४/२०१४-१५ दिनांक २०.८.२०१४ अन्वये मिळाला होता असे सकृतदर्शनी दिसून आलेले आहे. तथापि; सदर बांधकाम परवाना हा सि. स. क्र.८१३ मध्येच केवळ बांधकाम करणेस वादींना परवानगी दिल्यासंबंधीचा आहे ही बाब विसरुन चालणार नाही. विशेष बाब अशी

की, प्रस्तुतकामी वादींनी सि. स. क्र.८१३ या मिळकतीचे एकूण क्षेत्र ९९२.६ चौरस मिटर असे जरी दर्शविले असले तरीदेखील सि. स. क्र.८१३ व सि. स. क्र.८१० या दोन्ही मिळकतींच्यामध्ये असणारी मोकळी जागा अथवा बोळरस्ता याची लांबी रुंदी काय आहे हे प्रथमदर्शनी वादपत्रात त्यांनी दिलेले नाही. शिवाय; उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, शिरोळ यांच्याकडील वर नमूद मिळकतींचे ज्या नकाशांच्या प्रमाणित प्रती प्रस्तुतकामी सादर झाल्या आहेत त्यांचे अवलोकन केले असता; वर नमूद दोन्ही मिळकतींच्या मध्ये असलेली मोकळी जागा ही सि. स. क्र.८१३ अथवा सि. स. क्र.८१० यापैकी कोणत्याही मिळकतीचा भाग असल्याचे सकृतदर्शनी दर्शवित नाहीत. याउलट; नकाशांमध्ये सि.स.क्र.८१३ व ८१० या मिळकतींच्या हद्दी बंद केल्या असल्याचे स्पष्टपणे प्रथमदर्शनी दिसून येत असून, दोन्ही मिळकतींच्या हद्दी बंद झाल्यानंतर मध्ये मोकळी जागा असल्याचे दिसते. वादींनी बोळरस्त्याचे सविस्तर वर्णन वादपत्रात सकृतदर्शनी दिलेले नाही. नकाशांच्या प्रतीमध्ये आडव्या रेषा मारलेल्या सि. स. क्र.८१३ या जागेचा वर नमूद मोकळी जागा हा एक भाग आहे असे सकृतदर्शनी कोठेही दिसून येत नाही. शिवाय; वादकथनानुसार, जर सि. स. क्र.८१३ या मिळकतीचीच वर नमूद मोकळी जागा ही एक भाग असती तर नकाशात व सनदेमध्ये सि. स. क्र.८१३ पासून ती जागा वेगळी जागा दर्शविण्याचे सकृतदर्शनी काहीच कारण नव्हते. दिनांक १४.८.२०१४ रोजीच्या पत्रावरुन सि. स. क्र.८१३ मधील कथित पूर्वेकडील मोकळया जागेत कंपाउंडचे बांधकाम करणार असून, तशी परवानगी देण्यात यावी असे विशिष्ट वादींनी म्हटलेले नाही. तसेच संबंधीत ग्रामपंचायतीनेदेखील मोकळया जागेच्या अनुषंगाने बांधकाम करण्याची परवानगी वादींना दिली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून आलेले नाही.

२१. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी त्यांच्या कैफीयतीत जर सदर प्रतिवादींसमवेत वादींची 'सामाईकातील वहिवाट ' सकृतदर्शनी नमुद केली असली तरी देखील वादी हे सि. स. क्र.८१३ चाच खाजगी मालकीहक्क वहिवाटीचाच बोळरस्ता आहे अशी विशिष्ट केस घेवून आले असल्याने; तसे त्यांनी प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यानिशी शाबीत करणे जरुरीचे होते. उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय यांच्याकडील नकाशांच्या प्रमाणित प्रतीवरुन वर नमूद दोन्ही मिळकतींमधील असणारी मोकळी जागा ही शासनाच्या मालकीची असल्याची शक्यता सकृतदर्शनी नाकारता येत नाही. वादींनी प्रस्तुतकामी एकूण ९९२.६ चौरस मिटर यापैकी किती क्षेत्राचा बोळरस्ता आहे याबाबत सविस्तर विश्लेषण वादपत्रात दिलेले नाही. जर वादपत्रानुसार वादींच्या खाजगी मालकीहक्कवहिवाटीचा वर नमूद बोळरस्ता आहे तर त्या रस्त्याचा उल्लेख महसूल दप्तरी वादींच्या नावे नोंद होण्याकरीता त्यांनी आजपावेतो कोणताच प्रयत्न का केला नाही ही बाब सकृतदर्शनी विचारात घेणे जरुरीचे आहे. केवळ नकाशामधील दिसत असलेली मोकळी जागा ही सि.

स. क्र.८१३ या मिळकतीचा भाग असल्याची वादींनी सकृतदर्शनी जी केस समोर आणली आहे ती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्याखेरीज विश्वासास पात्र नाही. महात्मा गांधी तंटामुक्त समिती यांच्याकडील तडजोडनाम्यामधील परिच्छेद क्र.४ मधील उल्लेखावरुन विसंबून राहून वादींच्या हक्कात तुर्तातूर्त मनाई हुकूम प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्याविरुध्द देणे हे प्रस्तुतकामी जोखीम पत्करल्यासारखे होणार आहे. वादींनी सि.स.क्र.८१३ व ८१० या दोन्ही मिळकतींमधील असणा–या मोकळया जागेचा मालकीहक्काचा प्रथमदर्शनी कागदोपत्री पुरावा सादर न करता खाजगी मालकीहक्कवहिवाटीची जी वादपत्रात कथने सादर केली आहेत त्यावरुन ते प्रस्तुतकामी स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आले आहेत असे दिसून आलेले नाही. किंबहुना त्या जागेच्या मालकीच्या अनुषंगाने वादींकडून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुरावा सादर न झाल्याने, वादींनी प्रस्तुत अर्जात मागितलेली कसलीही तुर्तातूर्त मनाई हुकूमाची मागणी त्यांच्या हक्कात कदापीही मंजूर करता येणार नाही. वरील कारणांवरुन वादींतर्फे सादर झालेल्या न्यायनिवाडयातील मार्गदर्शक तत्वांचा त्यांना लाभ घेता येणार नाही.

२२. वादींनी प्रस्तुतकामी त्यांचे प्रकरण सकृतदर्शनी आहे हे शाबीत केलेले नाही. याउलट; नकाशाच्या आधारे सि. स. क्र.८१३ व ८१० या दोन्ही मिळकतींच्या मधील मोकळया जागेची मालकी प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्याखेरीज वादींनी सांगितलेली आहे आणि ती निश्चितपणे प्रथमदर्शनी विश्वसनीय नाही. प्रस्तुतकामी न्यायाचा तराजू हा वादींच्या बाजूने झुकणारा असल्याचे दिसून आलेले नाही. त्यामुळे तुर्तातूर्त मनाई हुकूम वादींच्या हक्कात न दिला गेल्यास, त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे असे कोठेही दिसून येत नाही. वरील संपूर्ण विवेचन पहाता मुद्दा क्रमांक १ ते ३ यांचे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येतात.

**<u>मुद्दा क्रमांक ४ करीता</u> :–**

२३. मुद्दा क्रमांक १ ते ३ यांच्या नकारार्थी निष्कर्षावरुन असे दिसून येते की, प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. करीता मुद्दा क्रमांक ४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. दिनांक १६.४.२०१५ रोजी प्रतिवादींविरुध्द करण्यात आलेला अंतरिम एकतर्फा मनाई हुकूम उठविण्यात येतो.

३. अर्जाच्या खर्चाबद्दल आदेश नाही.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

सही /-

दिनांक ३० सप्टेंबर, २०१५

( आर. आर. काळे)

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,

कुरुंदवाड.

I affirm that the contents of this P. D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | S.K.Yadav, Stenographer (L.G.) |
| Name of the Court | Civil Court Jr. Dn., Kurundwad. |
| Date of Dictation | 30.09.2015 |
| Order signed by the P. O. on | 30.09.2015 |
| Order uploaded on | 1.10.2015 |